## 'गोधुली'
## पशुपालन प्रश्नमंजूषा

1. जनावरांच्या नाकातील रक्त स्त्राव कसा थांबवावा ?

— कांदा सुंगणी द्यावी व थंड पाणी डोक्यावर टाकावे.

2. जनावरांना खाज आली तर त्यावर काय उपाय ?

— लसण कांदा लिंबू गुंजीच्या बिया बाभळीची साल व सिताफळाच्या बिया यांचे समप्रमाणतील मिश्रण रोज चमडीला लावावे.

3. शेळयांच्या मलमुत्राच्या सुद्धा शेतासाठी उपयोग करता येत असेल ना ?

— शेतीच्या मगदूर वाढवून जास्त उत्पत्र घेण्यासाठी सेंद्रीय शेतीच्या प्रयोगांमध्ये शेळयांच्या लेंडयाचे व मुत्राचे खत हे निश्चीतच फायदेशीर ठरेल.

— काही भागात तर 1 ते 2 रू. किलोनी ते विकल्या जाते व त्यावर आणखी काही प्रयोग करून घरातील कुंडयामधील व परसबागेसाठी शहरी भागात तर ते 3 ते 5 किलो प्रमाणे विकल्या जाते त्यामुळे हा फायदा आहेच.

4. पैदासीच्या बोकाडाचे वय किती असावे ?

— पैदासीच्या बोकडयाचे वय कमीकमी 3 वर्षेअसावे. याचे वजन साधारणतः 30 किलो असावे. या बोकडयापासून कळपामध्ये 2 ते 3 वर्षापर्यंत पैदास घेण्यात यावी, यानंतर हा बोकूड वापरू नये.

5. शेळीपालनामुळे शेतकऱ्याना फायदा कसा होतो ?

— कमी देखभाल, कमी प्रतीचे व अत्यल्प खाद्य, त्याची उपलब्धता व शेळयांची नैसर्गिक रोगप्रतीकारक क्षमता हयामुळे चांगली होणारी पैदास ही शेतकऱ्यंना निश्चीतच आर्थीक हातभार लावू शकते.

— खाद्य कमी लागत असल्यामुळे अडचणीच्या दिवसात झाडाच्या डहाळया आणून टाकल्यास शेळी आपले पोट भरते.

— फळांचे साल, उरलेल्या भाज्या वगैरे पूरक म्हणून देता येतात.

6. उस्मानाबादी शेळीच्या प्रजातीची माहीती देणार का ?

— हया प्रजातीच्या दुसरे नाव ''डेक्कनी'' देखील आहे. महाराष्ट्राच्या उस्मानाबाद जिल्हयात आढळतात.

— आकाराने मोठी असून काळया रंगाची असते. परंतु पांढरा—काळा तथा लाल रंगाचे मिश्रण असणाऱ्या देखील आढळतात.

— शिंग लांब राहतात. सरासरी 1 ते 2 किलोग्रम प्रतिदिन दुधाचे उत्पादन असते.

— एका बेतात दोन पिलांना जन्म देतात. मांस उत्पादनासाठी अधिक प्रमाणावर वापर करण्यात येते.

7. एक बोकड किती शेळयांसाठी ठेवावा ?

— साधारणपणे 25 शेळयामागे 1 बोकाड असावा .

8. जातीवंत पैदासक्षम बोकडाची खरेदी कुठुन करावी ? काही पत्ते/ठिकाण दिल्यास फार बरे होइल ?

— आपल्या कळपातील बोकड हा अत्यंत महत्वाचा भाग आहे, हे मघाशी आपणाला सांगीतले आहे, ते मिळण्यासाठी महत्वाच्या संस्थांची नावे.

1) व्यवस्थापक
पुण्याश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र शेळी व मेंढी विकास महामंडळ, मेंढी फार्म, गोखले नगर, पुणे—13

2) उस्मानाबादी शेळी मार्केटिंग सर्व्हीसेस
भवानी चौक, बायपास रोड, उस्मानाबाद—413 501

3) कृषि विज्ञान केंद्र
केंद्रिय कापूस संशोधन संस्था, खापरी, वर्धा रोड, नागपूर

4) निरा व्हॅली जेनेटीक लिमीटेड
पी.बी.नं. 23, लोनंद रोड, फलटण जि. सातारा—415523

9) म्हशीतील माज कसा ओळखावा ?

— योनी सैल होते. थोडी थोडी लघवी करते. यौनीच्या आजुबाजुला पांढरा क्षार जमा होतो. योनीतुन चिकट सीठ येतो. दुध उत्पादन कमी होते. भूक मंदावते.

10) पावसाळयामुळे जनावराचे दूध पातळ का होते?

— पावसाळयामध्ये जनावरांना फक्त हिरवा चारा देतात. कारण तो मुबलक प्रमाणत उपलब्ध असतो. कोरडा चारा जनावरांना न मिळाल्यामुळे त्यांचे दुध पातळ होते. कारण दुधातील घट्टपणा हा चाऱ्यातील तंतूमय पदार्थ्यांवर अवलंबून असतो. कोरडया/वाळलेल्या चाऱ्यामध्ये तंतूमय पदार्थ्यांचे प्रमाण जास्त असते. म्हणून हिरवा व वाळलेला चारा दोनी समान प्रमाणात द्यावा.

11. जनावरांना हागवण (अतिसार) लागल्यावर काय उपाय करावे ?

— काथ 50 ग्रॅम, खडूची पावडर 100 ग्रॅम, जायफळ 20 ग्रॅम यांचे मिश्रण करून मोठया जनावरास 20—30 ग्रॅम आणि लहानास 10 ग्रॅम दिवसातून दोन वेळा पाण्यातून पाजावे.

12. साधारण होणाऱ्या अपचनावर उपाय काय आहे ?

— सुंठ 100 ग्रॅम, ओवा 100 ग्रॅम, काळे मिरे 50 ग्रॅम, हिंग 20 ग्रॅम, काळे मिठ 50 ग्रॅम, जीरे 50 ग्रॅम, यांचे मिश्रण 50 ग्रॅम, रोज दोन वेळा गुळातुन अथवा कणकणेतुन चारावे.

13. म्हैस दुध कमी देते. खाद्य कोणते द्यावे ?

— भरपूर हिरवा चारा व वाळलेला चारा द्यावा. उदरनिर्वाहासाठी 2 किलो संतुलीत आहार व 5 लिटर दुध देणाऱ्या म्हशीला कमीतकमी 3 किलो सुग्रास/अंबोवण द्यावे. लेप्टाडेनच्या 5/10 गोळया द्याव्यात. जंताचे औषध द्यावे.

14. डोळयांचे आजार काय आहेत ?

— डोळे दुखणे, पाणी वाहाणे, डोळे सुजणे, हा त्रास होतो. उपाय— एक ग्रॅम तुरटी शंभर मिली. पाण्यात विरघळवून द्रावणाने डोळे धुवावे अिवा बाळ हिरडे तुपात भाजून त्यात मिठ घालून चूर्ण करून डोळया भोवती लावावे.

15. कातडीचे स्वास्थ व केस वाढकरीता उपाय काय आहे ?

— 15 दिवस सिसम तेल चमडीला रोज एक वेळेस लावावे.

16. जार न पडल्यास काय करावे ?

— कापूस (मुळाची साल (30), कलोंजी (20), तांव(10), हरमल (10), इश्वरी(20), यासगळयांचे मिश्रण दिवसातून दोनवेळा नियोजित मात्रेत द्यावे.

17. पोटफुगीला काय उपाय आहे ?

— ओवा(20), धणे(10), जिरे(15), बदीसोप(10) , हळद(15), काळे मिठ(30) यांचे मिश्रण करून दिवसातून दोन वेळा नियोजीत मात्रेत द्यावे. किंवा अर्धा किलो खाते तेलात 30 मिली तारपीन तेल व 10 ग्रॅम हिंग टाकून मिश्रण पाजावे.

18. पोट गच्च होण्यावरती उपाय काय आहे ?

— हिरडा(30) , आवळा(30) , मुरूडशेंग(15) , सोनामुखी(15) यांचे मिश्रण करून दिवसातून दोनवेळा देणे. (20 ग्रॅम मिश्रण मोठया गाईला देणे),
(15 ग्रॅम मिश्रण लहान गाईला देणे).

19. तोंड येणे व तोंडखुरी वर काय उपाय आहे ?

— हळद(15) , कोरफड(5) , जेष्ठमध(4) , अर्जुणसाल(10) , काथ(10) , तुळस(5) गेरू(50) , याचा लेप किंवा तुरटी(10) , हळद(10) , व ठीस(10), यांचे तेलात मिश्रण करून तोंडातील आतल्या भागास लेप लावावा.

20. खरूज, केस गळणे, पुरळ या सगळया त्वचा विकारांवर उपाय काय आहे ?

— करंज तेल 10 मि.ली., कडुलिंब तेल 10 मि.ली., अर्जुन 5 मि.ली., हळद 5 ग्रॅम, कन्हेर 3 ग्रॅम, तुळसतेल 5 मि.ली. हे सगळे एकत्र करून बाधीत भागावर लावाव्यात.

21. मुकामार लागल्यामुळे जनावर लंगडते आहे तर त्यावर उपाय काय आहे ?

— निर्गुडी 10 मि.ली., निलगीरी तेल 15 मि. ली., कापूर 4 ग्रॅम, लसून 5 ग्रॅम, सुंठ/अद्रक 4 ग्रॅम, टरपेंटाईन तेल 20 मि.ली. यांचे मिश्रण बाधीत जागेवर लावावे.

22. जनावरांना उसाचे वाढ खाऊ द्यावेत काय ?

— उसाच्या वाढयात ऑक्झालेट असते. शरीरातील कॅल्शियम सोबत त्याचे संयुग कॅल्शियम ऑक्झालेट तयार होऊन शरीराच्या बाहेर टाकल्या जाते. त्यामुळे शरीरातील कॅल्शियम कमी होवून आजार होतात. विशेषतः दुभत्या जनावरांना उसाचे वाढ चारणे टाकावेत.

23. जनावरांना साधारणतः किती पाणी लागते ?

— जनावरांच्या खद्यातले कोरडे भागाचे प्रमाण 2.5 ते 3 टक्के असायला हवे. मोठया जनावरांत 1:3 हया प्रमाणत मोठया जनावरांना 40—60 लिटर पाणी लागते. तथा या पाण्याची मात्रा वातावरणातील तापमानावर अंवलबून असते.